भाप्रसे (संवर्ग) नियम, १९५४ मधील ४ (२) मधील परंतुकानुसार Apex Scale [Level १७ in the Pay Matrix] या संवर्गात तात्पुरत्या स्वरुपात निर्माण करण्यात आलेल्या तीन पदांना मुदतवाढ देण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एईओ-१०२६/प्र.क्र.१९/२०२६/भाप्रसे-१,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
**तारीख: ३०.०४.२०२६**

**संदर्भ**:- १) साप्रवि, शासन निर्णय क्र. एईओ-१०२४/प्र.क्र.३६८/२०२४/भाप्रसे-१, दिनांक २७.१२.२०२४.
२) साप्रवि, शासन निर्णय क्र. एईओ-१०२५/प्र.क्र.३४२/२०२५/भाप्रसे-१, दिनांक ३१.१२.२०२५.

**प्रस्तावना-**

कार्मिक, सार्वजनिक गाऱ्हाणी व निवृत्ती वेतन मंत्रालय (कार्मिक व प्रशिक्षण विभाग), भारत सरकार यांच्या दिनांक ०६.१२.२०२३ च्या अधिसूचनेअन्वये, राज्यातील भारतीय प्रशासन सेवेतील संवर्ग पदांचे संख्याबळ निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार Apex Scale: Level १७ in the Pay Matrix या संवर्गात ८ संवर्ग पदे मंजूर आहेत. तसेच भाप्रसे (वेतन) नियम, २०१६ मधील नियम १२ (७) मधील तरतूदीनुसार आणखी ८ संवर्गबाह्य पदे (SDR) भरता येतात. प्रशासकीय निकडीस्तव सदर संवर्गात संदर्भाधीन शासन निर्णयान्वये तात्पुरत्या स्वरुपात निर्माण करण्यात आलेल्या पदांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

भारतीय प्रशासन सेवा (संवर्ग) नियम, १९५४ मधील नियम ४ (२) च्या दुसऱ्या परंतुकान्वये Apex Scale: Level १७ in the Pay Matrix या श्रेणीत संदर्भाधीन दिनांक २७.१२.२०२४ च्या शासन निर्णयान्वये तात्पुरत्या स्वरुपात निर्माण करण्यात आलेल्या ०५ पदांपैकी ०३ पदांना दिनांक ०१.०४.२०२६ पासून दिनांक ३१.१२.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४३०११२७४८०२०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by SUBHASH HANMANT UMARANIKAR
Date: 2026.04.30 11:28:45 +05'30'

**(सुभाष उमराणीकर)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय,
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय,
४. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय,
५. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
६. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
७. महालेखापाल, मुंबई/नागपूर,
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९. निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
१०. निवड नस्ती.